# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११००४

परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/इ. ११ वी मराठी भाषा युवकभारती/२८३७

दिनांक १३/०४/२०१६

विषय : इयत्ता ११ वी मराठी भाषा युवकभारती पुनर्रचित पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून त्यापुढील वर्षासाठी लागू करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी मराठी भाषा युवकभारती या पाठ्यपुस्तकाची पुनर्रचना करण्यात आलेली असून शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून त्यापुढील वर्षासाठी सदर पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे राज्यातील इयत्ता ११ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सदर पुनर्रचित पाठ्यपुस्तकाप्रमाणेच कार्यवाही करावी. सन २०१२-२०१३ पासून सन २०१५-१६ पर्यंत लागू करण्यात आलेले इयत्ता ११ वी मराठी भाषा युवकभारती हे (जुने पाठयपुस्तक) पाठ्यपुस्तक वापरण्यात येऊ नये. तरी, सन २०१६-१७ पासून लागू करण्यात आलेल्या सदर इयत्ता ११ वी मराठी भाषा युवकभारती या नवीन पाठयपुस्तकाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या सूचना संबंधित शिक्षकांना देण्यात याव्यात. याची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्याची सर्वस्व जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील. तसेच बदललेल्या पाठयपुस्तकाची माहीती सर्व संबंधित विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या निदर्शनास आणावी याची नोंद घ्यावी.

सचिव
राज्य मंडळ,
पुणे - ४११००४

प्रति,
प्राचार्य,
१० वी सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महा.
पुणे/अहमदनगर/सोलापूर

क्रमांक पुविमं/डीपी/मार्च-१६
पुणे ४११००५
दिनांक ३०/०५/२०१६

उपरोक्त राज्य मंडळाच्या प्रकटनाची नोंद घेवून,बदललेल्या पाठयपुस्तका बाबत संबंधित विदयार्थी,पालक,शिक्षक इ.सर्व संबंधित घटकांपर्यंत माहिती निर्देशनास आणून देण्यात येवून , काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.तसेच दर्शनी भागावर सदरचे प्रकटण लावावे.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.

custody vibhajan 2016